# महाराष्ट्र विधानपरिषद

## पत्रक भाग दोन

**गुरुवार, दिनांक २७ जून, २०२४/ आषाढ ६, १९४६ (शके)**

**४५. सन २०२४-२०२५ च्या अतिरिक्त अर्थसंकल्पीय प्रकाशनांचा पेनड्राईव्ह असलेल्या सुटकेसेसचे वितरण**

विधानपरिषदेच्या सर्व सन्मा.सदस्यांना कळविण्यात येते की, सन २०२४-२०२५ च्या अर्थसंकल्पीय प्रकाशनांचा पेनड्राईव्ह असलेल्या सुटकेसेसचे टोकन्स **मा.सदस्यांना शुक्रवार, दिनांक २८ जून, २०२४ रोजी उपस्थितिपटावर स्वाक्षरी करतांना व शनिवार, दिनांक २९ जून, २०२४ पासून अधिवेशन संस्थगित होईपर्यंत "ड-३"** (अंदाज समिती) कक्ष, **बारावा मजला, कक्ष क्रमांक १२०२, विधान भवन, मुंबई** येथे वितरीत करण्यात येतील. त्यानुसार सन्मा.सदस्यांनी सदर टोकन्स खालील सुटकेस वितरणाच्या ठिकाणी जमा केल्यानंतर अर्थसंकल्पीय प्रकाशनांचा पेनड्राईव्ह असलेल्या सुटकेसेस त्यांना वितरीत करण्यात येतील.

| अ.क्र. (१) | वार व दिनांक (२) | अर्थसंकल्पीय प्रकाशनांचा पेनड्राईव्ह असलेल्या सुटकेस वितरणाचा कालावधी (३) | ठिकाण (४) |
|---|---|---|---|
| १. | शुक्रवार, दिनांक २८ जून, २०२४ | अर्थसंकल्पावरील मा.उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांचे भाषण संपल्यानंतर | विधान भवन करीता आरक्षित असणाऱ्या वाहनतळाच्या मोकळया जागेवर उभारण्यात आलेल्या मंडपामध्ये, विधान भवन, मुंबई. |
| २. | शनिवार, दिनांक २९ जून, २०२४ पासून अधिवेशन संस्थगित होईपर्यंत | सकाळी १०.३० ते सायंकाळी ६.३० वाजेपर्यंत | गोल इमारतीतील मध्यवर्ती सभागृहासमोरील दालन क्रमांक ४ (अ), चौथा मजला, विधान भवन, मुंबई. |

सर्व सन्मा.सदस्यांना कळविण्यात येते की, अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर अर्थसंकल्पीय प्रकाशनांचा पेनड्राईव्ह असलेली सुटकेस त्यांनी कृपया लवकरात लवकर प्राप्त करुन घ्यावी.

मा.मंत्री यांच्या खाजगी सचिवांनी उपरोक्त टोकन्स तसेच अर्थसंकल्पीय प्रकाशनांचा पेनड्राईव्ह असलेली सुटकेस नेण्याची व्यवस्था करावी.

---

जितेंद्र भोळे
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २७ जून, २०२४

**याची प्रत :**

१) महाराष्ट्र विधानपरिषदचे सर्व सन्मा.सदस्य.
२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.
३) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.